# शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग बंद

गर्दी टाळण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठनेही अधिविभाग बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयेदेखील ३१ मार्चपर्यंत बंद ठेवण्यात यावी, असा आदेश कुलसचिवांनी दिला आहे; मात्र सर्व परीक्षा नियोजित वेळेनुसार घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांची हजेरीही बायोमॅट्रिकद्वारे न घेता सहीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# विद्यापीठातील 'बायोमेट्रिक' हजेरी आजपासून स्थगित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, सर्व अधिकारी, शिक्षक आणि प्रशासकीय सेवकांची बायोमेट्रिक थंब इम्प्रेशनद्वारे होणारी हजेरी आज, सोमवारपासून स्थगित केली जाणार आहे. कोरोना विषाणू संसर्गाचा धोका टाळण्यासाठी व संसर्ग पसरु नये याबाबतचा खबरदारीचा उपाय म्हणून विद्यापीठ प्रशासनाने हा रविवारी निर्णय घेतला आहे.

त्यासह नियोजित चर्चासत्रे, कार्यशाळा, अधिवेशने, क्रीडा स्पर्धा दि. ३१ मार्चपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यापीठातील ग्रंथालय आणि सर्व वाचनकक्ष, क्रीडा विभाग व मैदानावरील सर्व खेळ प्रकार, आदी सुविधा देखील बंद राहणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

## नागरिकांनी विद्यापीठात येणे टाळावे

फिरावयास येणाऱ्या नागरिकांनी या कालावधीत फिरावयास येणे टाळावे. विविध अधिकार मंडळांचे सदस्य, विद्यापीठ अधिकारी, शिक्षक, प्रशासकीय सेवकांच्या वाहनांव्यतिरिक्त इतर सर्व वाहनांना प्रवेश निषिध्द करण्यात येत आहे. अतिथीगृहामध्ये अतिथींनी येण्याचे टाळावे.विद्यार्थ्यांनी आवश्यकतेनुसार आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. नांदवडेकर यांनी केले आहे.

# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी घ्या : कुलसचिव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत आवश्यक त्या सूचनेचे परिपत्रक कुलसचिव डॉ. बिलास नांदवडेकर यांनी विद्यार्थी, अधिविभाग यांच्यासाठी काढले आहे.

विद्यापीठातील सर्व अधिविभागातील अध्यापनाचे कामकाज ३१ मार्चअखेर बंद राहतील. सर्व अधिविभागातील सर्व नियोजित चर्चासत्रे, कार्यशाळा, अधिवेशने आणि क्रीडा स्पर्धा पुढे ढकलण्यात याव्यात. विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील आरोग्य तपासणी शिबिर पुढे ढकलण्यात यावे. सर्व अधिविभागातील अंतिम प्रात्याक्षिक, तोंडी व लेखी परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होतील.

प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या दृष्टिकोनातून ग्रंथालय व सर्व वाचन कक्ष, क्रीडा विभाग व मैदानावरील सर्व खेळप्रकार योगा वर्ग, क्रीडा विभागातील व खुली व्यायामशाळा बंद राहतील. सर्व अधिविभागातील पूर्वनियोजित सर्व अभ्यास सहली पुढे ढकलण्यात याव्यात अथवा रद्द करण्यबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा.

विद्यापीठ परिसरात कालावधीत सकाळी व संध्याकाळी फिरावयास येणाऱ्या नागरिकांनी या कालावधीत फिरावयास येणे टाळावे. विविध अधिकार मंडळांचे सदस्य, विद्यापीठ अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय सेवक यांच्या वाहनांव्यतिरिक्त इतर सर्व वाहनांना प्रवेश निषिद्ध करण्यात येत आहे. या कालावधीत विद्यापीठाच्या अतिथीगृहामध्ये अतिथींनी येण्याचे टाळावे, अशा सूचना कुलसचिवांनी काढलेल्या परिपत्रकात दिल्या आहेत.

अपवादात्मक परिस्थितीत जे विद्यार्थी वसतिगृहात राहतील ते अनावश्यकरीत्या विद्यापीठ परिसरात व शहरामध्ये फिरणार नाहीत आणि वसतिगृहामध्ये स्वत:ला सुरक्षित ठेवतील, अशा स्पष्ट सूचना संबंधितांनी द्याव्यात, असेही परिपत्रकात म्हटले आहे.